# <u>प्रेसनोट</u>

दि. १८/१२/२०२३

**शिधा पत्रीका पुर्ववत करण्यासाठी व अन्न धान्य पुरवठा चालु करण्यासाठी मध्यस्थी करणा-या खाजगी इसमावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | समर्थ पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अ. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ६७ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | शंकर शिवाजी क्षिरसागर, वय ३२ वर्ष, रा. राजीव गांधी नगर, पुणे. (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४,५००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | २,८००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २,८००/- रुपये |
| पडताळणी दिनांक | ०५/१२/२०२३ |
| सापळा दिनांक | १८/१२/२०२३ |

ठिकाण :- जुनी जिल्हा परिषद समोर फुटपाथवर, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे त्यांचे नावे असलेली शिधापत्रीका पूर्ववत करणेसाठी व अन्न धान्य पुरवठा चालु करणेकरीता जुनी जिल्हा परिषद इमारतीमधील अन्न धान्य वितरण पुरवठा अधिकारी याना तक्रारदार भेटले. सदर कार्यालयाचे ठिकाणी असलेला खाजगी इसम शंकर क्षिरसागर याने तक्रारदार यांना साहेबाचे काम मी करतो व तुमचे रेशनकार्ड काढून देतो असे सांगून तक्रारदार यांचेकडे ४,५००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यानी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, खाजगी इसम शंकर क्षिरसागर यानी तक्रारदार यांचेकडे त्यांचे वरील काम करून देणेसाठी साहेबांना पैसे द्यावे लागतील असे सांगून तडजोडीअंती २,८००/- रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष मागणी करुन, आरोपी खाजगी इसम शंकर क्षिरसागर यानी तक्रारदार यांचेकडून रुपये २,८००/- (दोन हजार आठशे रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. खाजगी इसम शंकर क्षिरसागर याना ताब्यात घेण्यात आले असून त्यांचेविरुद्ध समर्थ पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रविण निंबाळकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.